# माहिती पत्रक

हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे

ता. खेड, जि. पुणे - ४१२४०२. मो. नं. ९४२३१९२६९२

ID No. : PU/PN/ACS/281/2007
College Code No. : 830
Email : acscollegedehane@gmail.com

## कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, डेहणे

ता. खेड, जि. पुणे - ४१२४०२.

मा.क्र.शिउसं/उमाशि/पुवि/स्वअशामा/मान्यता/१३-१४/३०४५
(दि. २१ नोव्हेंबर २०१३)
INDEX No. : J.11.08.026
Email : acscollegedehane@gmail.com

**शैक्षणिक वर्ष : २०२२-२३**

## हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे - ४१०५०५.

# संचालक मंडळ

| अ.क्र. | नाव | पद/हुद्दा |
|---|---|---|
| १. | आमदार श्री. दिलीपराव दत्तात्रय मोहिते पाटील | संस्थापक-अध्यक्ष |
| २. | मा. सी.ए. बबनराव सोपान डांगले | उपाध्यक्ष |
| ३. | प्राचार्य डॉ. शिवाजीराव निवृत्ती मोहिते | सरचिटणीस |
| ४. | मा. सौ. सुरेखाताई दिलीपराव मोहिते पाटील | खजिनदार |
| ५. | मा. श्री. आबासाहेब विनायक जगताप | संचालक |
| ६. | मा. श्री. शांताराम महादू देशमुख | संचालक |
| ७. | मा. ॲड. श्री. सुभाष विठ्ठल मोहिते पाटील | संचालक |
| ८. | मा. श्री. अरुण सिताराम चांभारे | संचालक |
| ९. | मा. श्री. शिवाजीराव दत्तात्रय वाळुंज | संचालक |
| १०. | डॉ. सौ. प्रमिला दिलीप बांबळे | संचालक |

।। जीवनाय ज्ञानं वरम्।।

हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे**

ता. खेड, जि. पुणे - ४१२ ४०२.

# महाविद्यालय विकास समिती

| क्र. | नाव | पद/हुद्दा |
|---|---|---|
| १. | आमदार श्री. दिलीपराव दत्तात्रय मोहिते-पाटील | संस्थापक/अध्यक्ष |
| २. | मा. प्राचार्य डॉ. शिवाजीराव निवृत्ती मोहिते | शिक्षणतज्ज्ञ |
| ३. | मा. सौ. सुरेखाताई दिलीपराव मोहिते-पाटील | समाजसेविका |
| ४. | मा. श्री. बाळासाहेब पोपट गोपाळे | संशोधक |
| ५. | मा. श्री. शिवाजीराव दत्तात्रय वाळुंज | उद्योजक |
| ६. | मा. श्री. शरद मारुती मुके | माजी विद्यार्थी |
| ७. | प्रा. सिलदार तुडका पावरा | विभाग प्रमुख |
| ८. | प्रा. अस्मिता देविदास गायकवाड | शिक्षक प्रतिनिधी |
| ९. | प्रा. राहुल भागवत गायकवाड | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | प्रा. अनिता ज्ञानेश्वर मुळूक | महिला शिक्षक प्रतिनिधी |
| ११. | प्रा. शिवाजी संभाजी गायकवाड | गुणवत्ता सुधार समन्वयक |
| १२. | मा. श्री. निवृत्ती किसन भालेराव | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |
| १३. | कु. गोडे अमोल चिमाजी | विद्यापीठ प्रतिनिधी |
| १४. | मा. प्राचार्य डॉ. जयराम पांडुरंग खाडे | समिती सचिव |

# मनोगत

■ **प्राचार्य डॉ. जयराम पांडुरंग खाडे**
कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, डेहणे

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या यज्ञकुंडात आपल्या प्राणाची समाधी अर्पण करून हौतात्म्य पत्करलेले थोर क्रांतीकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या नावाने हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना सन २००५ मध्ये करण्यात आली. ''जीवनाय ज्ञानं वरम्'' या ब्रीदवाक्याचा स्वीकार करून खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आदिवासी व शेजारी भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानाचे वरदान देऊन त्यांचा जीवनाचा पाया भक्कम करण्याचे कार्य हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळ करत आहे.

संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष व खेड तालुक्याचे भाग्यविधाते मा. आमदार दिलीपशेठ मोहिते-पाटील यांनी काळाची पाऊले व समाजाची गरज ओळखून खेड तालुक्याच्या पश्चिम दिशेला ४३ कि.मी. अंतरावर डेहणे या आदिवासी व डोंगरी गावात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सन २००७ मध्ये सुरू केले. आज या महाविद्यालयात एकूण ५५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

डेहणे हे गाव व आजुबाजूच्या पंचक्रोशीचा परिसर अतिशय दुर्गम, डोंगराळ व आदिवासी भाग म्हणून ओळखला जातो. देशाच्या व महाराष्ट्राच्या प्रगतीचा परीघ अनेक भागांत विस्तारला जात असताना, विकासाचे आलेख उंचावले जात असताना, शिक्षणाची सरीता देश व राज्य पातळीवर नवे-नवे उच्चांक गाठत असताना डेहणे सारख्या आदिवासी भागात उच्च शिक्षणाचे दार उघडायला २००७ हे वर्ष उजाडले. ही बाब तशी या परिसराच्या दृष्टीने परिवर्तनाची नांदी ठरणारी अशीच आहे. कारण या परिसरातील मुले-मुली उच्च शिक्षणापासून वंचित कोसो दूर होती. हा परिसर डोंगर-दऱ्यांनी व्यापलेला असल्याने दळणवळणाची सोय नव्हती. ज्यामुळे विद्यार्थी शहरातील महाविद्यालयात पोहोचू शकत नव्हता. या परिसरातील बहुतांश असलेला आदिवासी बांधव आपल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या पाल्याला दूर शहरी भागात ठेवून शिक्षण देऊ शकत नव्हता. आपल्या जनतेची उच्च शिक्षणाविषयीची ही महत्त्वाची अडचण ओळखून केवळ सेवाभावी वृत्तीने, सन २००७ साली वरीष्ठ व सन २०१४-१५ पासून कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले असून, या महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखा सुरू करण्यात आल्या आहेत.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा, परिपूर्ण ग्रंथालय, सर्व सोयीसुविधांनी युक्त प्रशस्त इमारत, संगणक, प्रयोगशाळा, जीमखाना, इ. अद्ययावत सुविधा संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. शिस्तबद्ध प्रशासन, भव्य क्रीडांगण आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा ध्यास असलेले अनुभवी प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी, सेवक ही महाविद्यालयाची खास वैशिष्ट्ये आहेत.

महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होत राहील. महाविद्यालयाच्या नावलौकीकात निश्चितच भर पडेल.

याच सदिच्छेसह महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा!

# कनिष्ठ महाविद्यालय विभाग

## अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान

या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी एस.एस.सी.बोर्डाची शालांत परीक्षा (१०वी) अगर सरकारची मान्यता असलेली तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

■ **प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.**

१) माहिती पत्रकासोबत जोडलेला प्रवेश अर्ज संपूर्ण भरून प्रवेशाच्या वेळी कार्यालयात जमा करणे.

२) अर्जासोबत शालांत परीक्षेचे (१०वी) मूळ गुणपत्रक व त्याची एक सत्यप्रत जोडणे.

३) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) जोडणे आवश्यक आहे.

४) जिल्ह्याबाहेरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर (L.C.) संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांची सही व शिक्का मागील बाजूस आणावा.

■ **ए.टी.के.टी.पात्र विद्यार्थ्यांसाठी आवश्यक बाबी व सूचना :**

१) ११वी प्रवेशासाठी इ. १० वी मध्ये जास्तीत जास्त दोन विषयांत अनुत्तीर्ण असल्याची बोर्डाची मूळ गुणपत्रिका.

२) इ. १०वी मध्ये शिकत असलेल्या शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र.

३) विहीत नमुन्यातील पालकांच्या सहीचे हमीपत्र.

४) ए.टी.के.टी. पात्र विद्यार्थ्याने ऑक्टोबर किंवा मार्च एस.एस.सी. परीक्षा पास झाल्याचे मूळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला निर्धारीत वेळेत जमा न केल्यास त्याचा/तिचा प्रवेश आपोआप रद्द होईल.

## बारावी कला, वाणिज्य व विज्ञान

या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयाने घेतलेली अकरावीची (एफ.वाय.जे.सी.) वार्षिक अगर सरकारची मान्यता असलेली तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

■ **प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.**

१) माहिती पत्रकासोबत जोडलेला प्रवेश अर्ज संपूर्ण भरून प्रवेशाच्या वेळी कार्यालयात जमा करणे.

२) अर्जासोबत अकरावीच्या (एफ.वाय.जे.सी.) वार्षिक परीक्षेचे मूळ गुणपत्रक व त्याची एक सत्य प्रत जोडावी.

३) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) (अन्य कनिष्ठ महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी) जोडणे आवश्यक आहे.

४) जिल्ह्याबाहेरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर (L.C.) संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांची सही व शिक्का मागील बाजूस आणावा.

# अभ्यासक्रम : कनिष्ठ महाविद्यालय

**(JUNIOR COLLEGE)**

**CLASSWISE SUBJECT**

| अकरावी कला | | अकरावी वाणिज्य | | अकरावी विज्ञान | |
|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी | English | इंग्रजी | English | इंग्रजी | English |
| मराठी | Marathi | मराठी | Marathi | मराठी | Marathi |
| भूगोल | Geography | अर्थशास्त्र | Economics | भौतिकशास्त्र | Physics |
| इतिहास | History | व्यापार संघटन | O.C. | रसायनशास्त्र | Chemistry |
| राज्यशास्त्र | Politics | अकौंटन्सी | Book Keeping & Accountancy | जीवशास्त्र | Biology |
| अर्थशास्त्र | Economics | एस.पी./गणित | S.P./Maths | गणित | Maths. |

| बारावी कला | | बारावी वाणिज्य | | बारावी विज्ञान | |
|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी | English | इंग्रजी | English | इंग्रजी | English |
| मराठी | Marathi | मराठी | Marathi | मराठी | Marathi |
| भूगोल | Geography | अर्थशास्त्र | Economics | भौतिकशास्त्र | Physics |
| इतिहास | History | व्यापार संघटन | O.C. | रसायनशास्त्र | Chemistry |
| राज्यशास्त्र | Politics | अकौंटन्सी | Book Keeping & Accountancy | *जीवशास्त्र | *Biology |
| अर्थशास्त्र | Economics | एस.पी./गणित | S.P./Maths | *भूगोल | *Geography |
| | | | | * गणित | *Maths |

* पैकी दोन विषय निवडणे.

# वरिष्ठ विभाग

प्रथम वर्ष कला व वाणिज्य या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी एच.एस.सी. बोर्डाची (१२वी) अगर तत्सम मान्यता प्राप्त परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

- **प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.**

१) माहिती पत्रकासोबत जोडलेला प्रवेश अर्ज संपूर्ण भरून प्रवेशाच्या वेळी कार्यालयात जमा करणे.

२) एच.एस.सी.चे गुणपत्रक (मार्क लिस्ट) व त्याच्या दोन झेरॉक्स प्रती अर्जासोबत द्याव्यात.

३) कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला त्याच्या दोन सत्य प्रती व सोबत तीन आयकार्ड आकाराचे फोटो

४) शुल्क पत्रकात दर्शविल्याप्रमाणे प्रवेश अर्जासोबत शुल्क भरावे.
(हे शुल्क दोन हप्त्यात भरण्याची सवलत आहे.)

५) प्रथम वर्षासाठी पात्रता फॉर्म फी रुपये ३५०/- कार्यालयात भरावी.

६) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यास पुणे विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे वैद्यकिय तपासणी राहील. अधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्याकडून वैद्यकिय तपासणी खेरीज विद्यापीठाच्या परीक्षेस बसता येणार नाही.

७) ई-मेल आयडी अनिवार्य आहे.

- **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ/अन्य विद्यापीठातील दुसऱ्या महाविद्यालयांकडून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी**

१) पूर्वीच्या शिकत असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना वर्तणुकीचा दाखला (Bonafiled Certificate)

२) स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate)

३) स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

- **महाविद्यालयातील गतवर्षीच्या विद्यार्थ्यांसाठी**

(द्वितीय, तृतीय वर्ष कला व वाणिज्य वर्गासाठी)

गतवर्षी या महाविद्यालयात असणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी या माहिती पत्रकासोबत जोडलेला छापील प्रवेश अर्ज संपूर्ण व बिनचूक भरून आवश्यक त्या शुल्कासह कार्यालयात द्यावा. त्याचबरोबर मागील वार्षिक परीक्षेतील गुणपत्रिकेची सत्यप्रत बरोबर जोडावी.

।। जीवनाय ज्ञानं वरम्।।

# महाविद्यालयासाठीचा अभ्यासक्रम
# (कला शाखा)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी २०१९ पासून पदवी अभ्यासक्रमासाठी क्रेडीट व सेमिस्टर पॅटर्न सुरू केला असून, प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये दोन वेळा विद्यापीठ परीक्षा घेते. एकूण १०० गुणांची परीक्षा असून, त्यापैकी ७० गुणांची परीक्षा विद्यापीठ घेते व ३० गुणांची अंतर्गत परीक्षा महाविद्यालय घेते.

विद्यापीठाने क्रेडीट पॅटर्न सुरू केला असल्याने विद्यार्थ्यांना जादा क्रेडीट पॉईंट मिळवावे लागतात. जादा क्रेडीट पॉईंट मिळवण्यासाठी पदवीच्या तीन वर्षांमध्ये काही नवीन जादा विषयांचा (Value Added Course) अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागतो. तसेच प्रॅक्टीकल विषय, NSS, EVS यांचेही जादा क्रेडीट मिळतात. पदवीच्या एकूण तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी किमान १४८ क्रेडीट मिळवणे व सर्व विषयांना पास होणे आवश्यक आहे.

■ **प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.) अभ्यासक्रम**

या वर्गासाठी एकूण सहा विषयांचा अभ्यासक्रम असून त्याचा विषयवार तपशील पुढीलप्रमाणे :

इंग्रजी (अनिवार्य) Compulsory English

शारीरिक शिक्षण (अनिवार्य) Physical Education

■ **खालील सहा विषयांपैकी कोणत्याही पाच विषयांची निवड करा.**

| | |
|---|---|
| १) मराठी (Marathi) | २) भूगोल (Geography) |
| ३) राज्यशास्त्र (Politics) | ४) अर्थशास्त्र (Economics) |
| ५) इतिहास (History) | ६) शिक्षणशास्त्र (Education Science) |

■ **द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) अभ्यासक्रम**

या वर्गासाठी एकूण सहा विषयांचा अभ्यासक्रम असून त्याचा विषयवार तपशील पुढीलप्रमाणे :

**इंग्रजी (अनिवार्य) English Compulsory**

**पर्यावरण जाणीव जागृती Environment Awareness**

विशेष स्तरावर निवडलेल्या विषयाचे तीन पेपर्स (SPL-I, SPL-II, Gen.II) व सामान्य स्तरावर विशेष स्तरावर खालील विषयातून एकाची निवड करता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) इंग्रजी | मराठी | २) अर्थशास्त्र | ३) भूगोल |
| | (S-I) | (S-I) | (S-I) |
| | (S-II) | (S-II) | (S-II) |
| | (G-II) | (G-II) | (G-II) |

**सामान्य स्तरावर खालील ४ विषयांमधून २ विषयांची निवड करावी.**

१) मराठी　　　　２) राज्यशास्त्र

३) इतिहास　　　　४) भूगोल

- **महत्त्वाची सूचना :** २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून एस.वाय. बी.ए./बी.कॉम. या वर्गाच्या अभ्यासक्रमांतर्गत पर्यावरण जाणीव जागृती या सक्तीच्या विषयाचा समावेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केला असून प्रत्येक विद्यार्थ्याने त्याची लेखी परीक्षा, प्रोजेक्टची पूर्तता केल्याखेरीज तिला/त्याला पदवी देण्यास पात्र समजले जाणार नाही. याची प्रत्येकाने नोंद घ्यावी.
- **तृतीय वर्ष कला (T.Y.B.A) अभ्यासक्रम**

  या वर्गासाठी एकूण सहा विषयांचा अभ्यासक्रम असून त्याचा विषयवार तपशील पुढीलप्रमाणे :

  **या वर्गासाठी एकूण सहा विषयांचा अभ्यासक्रम असून, द्वितीय वर्ष 'कला' या वर्गासाठी निवडलेले विषय घ्यावे लागतील.**

## F.Y.B.A. (2019 Credit Pattern)
## Subject & Code

| | SEMESTER-I | | SEMESTER-II | |
|---|---|---|---|---|
| Sr. No. | Subject Name | Sub Code | Subject Name | Sub Code |
| 1 | Compulsory English -I | 11001 | Compulsory English -II | 12001 |
| 2 | Marathi Sahitya Katha Bhashik Kaushalya Vikas | 11021 | Marathi Sahitya Katha : Akankika & Bhashik Koushalyavikas | 12021 |
| 3 | Indian Economic Environment - I | 11151 | Indian Economic Environment - II | 12151 |
| 4 | Introduction To Indian Constitution - I | 11161 | Introduction To Indian Constitution - II | 12161 |
| 5 | Early India : From Prehistory to The Age of Mauryas - I | 11171 | Early India : Post Mauryan Age to The Rashrakuts - II | 12171 |
| 6 | Physical Geography | 11201 | Human Geography | 12201 |
| 7 | Optional English | 11331 | Optional English | 12331 |

# S.Y.B.A. (2019 Credit Pattern)
## Subject & Code

| | SEMESTER-III | | SEMESTER-IV | |
|---|---|---|---|---|
| Sr. | Subject Name | Sub Code | Subject Name | Sub Code |
| 1. | Compulsory English - I | 23001 | Compulsory English - II | 24001 |
| 2. | MIL-2 Marathi Bhashik Sandyapan Kaushalye | 23011 | MIL-2 Navmadhyame ani Samaj Madhymasathi Marathi | 24011 |
| 3. | CC-1C Bhashik Kaushalya Vikas Ani Adhunik Marathi Sahitya - Kadambari (Marathi) G2 | 23023 | CC-1C Bhashik Kaushalya Vikas Ani Adhunik Marathi Sahitya - Lalitgadhya (Marathi) G2 | 24023 |
| 4. | DSE- Adhunik Marathi Sahitya Prakashwata (S1) | | DSE-2A (3) - Madhyayugin Marathi Sahitya : Nivdak Madhyayugin Gadya Padya (S1) | |
| 5. | DSE-1B (3) Sahityavichar (S2) | | DSE-2B (3) Sahityasamiksha | |
| 6. | SEC-2A (2) Prakashanvyhar ani Sampadan | | SEC-2B (2) Upyojit Lekhan Kaoushlya | |
| 7. | DSE- 1A Micro Economics - I | 23151 | DSE- 1A Micro Economics - II | 24151 |
| 8. | DSE-1A Macro Economics-I | 23152 | DSE-1A Macro Economics-II | 24152 |
| 9. | CC-1C Financial System - I | 23153 | CC-1C Financial System - II | 24153 |
| 10. | SEC-2A Basic Concept of Reserch Methodology- I | 23154 | SEC-2B Basic Concept of Reserch Methodology - II | 24154 |
| 11. | Political Ideology - I (Politics) | 23164 | Political Ideology - II (Politics) | 24164 |
| 12. | CC-1C History of the Marathas : (1630-1707) ( History) | 23174 | CC-1C History of the Marathas:(1707-1818) (History) | 24174 |
| 13. | Economic Geography-I (Geography) | 23205 | Economic Geography - II | 24205 |
| 14. | ADSE-1A Appreciating Drama - I | 23331 | ADSE-1A Appreciating Drama - II | 24331 |
| 15. | ADSE- Appreciating Poetry | 23332 | ADSE- Appreciating Poetry | 24332 |
| 16. | SEC-1A Advaned Study of English Language | 23333 | SEC-1A Advaned Study of English Language | 24333 |
| 17. | A Certificate course In Skill Development (English) | 23334 | A Certificate course In Skill Development (English) | 24334 |
| 18. | AEC Environmental Science | 23999 | AEC Environmental Science | 24999 |
| 19. | 210 (A) - Environmental Geography | | 210 (B) - Environmental Geography | |
| 20. | 220 (A) - Geography of Maharashtra | | 220 (B) - Geography of Maharashtra | |
| 21. | 201 (A) - Practical Geography | | 201 (B) - Practical Geography | |
| 22. | SEC-2A - Scale and Map Projection Applied Course of Disaster Management | | Cortographic Techniques surveying and Excursion village Project Report Applied Course of Travel & Tourism | |

# T.Y.B.A. (2019 Credit Pattern)
## Subject & Code

| | SEMESTER V | | SEMESTER VI | |
|---|---|---|---|---|
| Sr. No. | Subject Name | Sub Code | Subject Name | Sub Code |
| 1 | Compulsary English | 35001 | Compulsary English | 36001 |
| 2 | GE - 2A - Generic Elective | 35002 | GE - 2A - Generic Elective | 36002 |
| 3 | CC-1 E Bhashik Kaushalyavikas ani Adhunik marathi sahitya prakar Pravasvarnan | 35023 | CC-1 E - Bhashik Kaushalyavikas ani Adhunik marathi sahitya prakar : Kavita | 36023 |
| 4 | DSE-2C - Madhyayugin Marathi Vangmayacha Sthul Itihas Prarambh Te 1600 | | DSE-2D - Madhyayugin Marathi Vangmayacha Sthul Itihas Prarambh Te 1601 to 1817 | |
| 5 | DSE-2C - Varnantmak Bhashavidnayan Bhag -I | | DSE-2D - Varnantmak Bhashavidnayan Bhag -II | |
| 6 | SEC-2C- Karkram Sanyojanatil Bhashik Kaushalya Bhag-I | | SEC-2D- Karkram Sanyojanatil Bhashik Kaushalya Bhag-II | |
| 5 | DSE-2C - Economics Special - III (Int. Economics) | 35151 | DSE-2C Economics Special - III (Int. Economics) | 36151 |
| 6 | DSE-2C Economics Special - IV (Public Finance) | 35152 | DSE-2C Economics Special - IV (Public Finance) | 36152 |
| 7 | CC-1E Economics General - III (Indian Economic Development) | 35153 | CC-1E Economics General - III (Indian Economic Development) | 36153 |
| 8 | SEC-2C Skill Enhancement Course | 35154 | SEC-2C Skill Enhancement Course | 36154 |
| 9 | CC1-E Local Self Government in Maharashtra (Politics) | 35164 | CC1-E Local Self Government in Maharashtra (Politics) | 36164 |
| 10 | CC- 1 E Indian National Movement (1885-1947) History | 35174 | CC- India After Independence (1947 - 1991) (History) | 36174 |
| 11 | CC-1E GG310(A) Geography of Tourism - I | 35204 | CC-1E GG310(B) Geography of Tourism - II | 36204 |
| 12 | CC-1E GG320(A) Geography of Rural Development | | CC-1E GG320(B) Geography of Rural Development | |
| 13 | CC-1E GG301(A) Pratical Geography Techniques of Spatial Analysis | | CC-1E GG301(B) Pratical Geography Techniques of Spatial Analysis | |
| 14 | SEC-2- Researche Mathodology - I | | SEC-2- Researche Mathodology - II | |
| 15 | DSE - 1C Appreciating Novel | 35331 | DSE - 1C Appreciating Novel | 36331 |
| 16 | DSE- 2C Introduction to literary Criticism | 35332 | DSE- 2C Introduction to literary Criticism | 36332 |
| 17 | SEC-1 C Enhancing Employability skills | 35333 | SEC-1 C Enhancing Employability skills | 36333 |
| 18 | SEC-2C Mastering life skills aad Life Values | 35334 | SEC-2C Mastering life skills aad Life Values | 36334 |

■ विद्यार्थ्यांना जादा गुणांक (क्रेडिट) मिळवण्यासाठी खालील विषयांची निवड करता येईल.

## Bachelor Of Arts Credit Courses

| Sr. No. | Subject Code | Subject Name |
|---|---|---|
| 1 | GR2-A | Sport Representation At College Level [G] |
| 2 | GR2-B | Sport Representation At University/State Level 2 [G] |
| 3 | GR3-A | National Social Service Scheme (Participation In Camp)[G] |
| 4 | GR3-E | N.S.S : Rd /Nic /Adventure /Youth Camps At State Level[G] |
| 5 | GR3-F | N.S.S : Rd /Nic /Adventure /Youth Camps Participation[G] |
| 6 | GR4-A | Avishkar/ Indnadhanushya/ Utkarsh/Awhan Activity Participat[G] |
| 7 | GR4-B | Avishkar/ Indnadhanushya/ Utkarsh/ Awhan Selection At Univer[G] |
| 8 | GR4-C | Avishkar/ Indnadhanushya/ Utkarsh/Awhan Winner At State Lev[G] |
| 9 | GR5-A | Research Paper Presentation At State Level[G] |
| 10 | GR5-B | Research Paper Presentation At National Level[G] |
| 11 | GR5-C | Research Paper Presentation At International Level[G] |
| 12 | GR6-A | A Participation In Summer School/Programme; Short Term Courses[G] |
| 13 | GR7-A | Field Visits[G] |
| 14 | GR7-B | Study Tours[G] |
| 15 | GR7-C | Industrial Visits[G] |
| 16 | GR7-D | Socio Cultural, Lingual Survey[G] |
| 17 | GR8-A | Online Certificate Courses/Mooc Courses/ Career Advancement[G] |
| 18 | GR9-A | Financial Literacy[G] |
| 19 | GR9-B | Rural Community Development[G] |
| 20 | GR9-C | Cyber Security[G] |
| 21 | GR9-D | Online Teaching[G] |
| 22 | GR9-F | Consumer Affairs[G] |
| 23 | GR9-G | The Electoral System & Voter Participation In Indian Democracy[G] |
| 24 | GR9-H | Democracy, Election And Governance [G] |

# वाणिज्य शाखा

- **प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com.) अभ्यासक्रम :** या वर्गासाठी एकूण सात विषयांचा अभ्यासक्रम असून, पुणे विद्यापीठाचा एफ.वाय.बी.कॉम. या वर्गाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे–

1) Com.- English
2) Financial Acconuting
3) Business Economics
4) Mathematics & Statistics
5) Optional Group (i) Commercial Geography
6) Optional Group (i) Marketing & Salesmanship
7) Additional Marathi
8) Physical Education (Compulsory)

- **द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com) अभ्यासक्रम :** या वर्गासाठी एकूण सहा विषयांचा अभ्यासक्रम असून त्याचा विषयवार तपशील पुढीलप्रमाणे :

1) Business Communication
2) Corporate Accounting
3) Business Economics (Macro)
4) Principal & Functions of Management
5) Element of Company Law
6) Environment Awareness
7) Optional Group
   (i) Business Administration (Paper-I)

- **महत्त्वाची सूचना :** २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून एस.वाय./बी.ए./बी.कॉम या वर्गाच्या अभ्यासक्रमांतर्गत पर्यावरण जाणीव जागृती या सक्तीच्या विषयाचा समावेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केला असून प्रत्येक विद्यार्थ्याने त्याची लेखी परीक्षा, प्रोजेक्टची पूर्तता केल्याखेरीज तिला/त्याला पदवी देण्यास पात्र समजले जाणार नाही. याची प्रत्येकाने नोंद घ्यावी.

- **तृतीय वर्ष वाणिज्य (T.Y.B.Com) अभ्यासक्रम**

**या वर्गासाठी एकूण सहा विषयांचा अभ्यासक्रम असून त्याचा विषयवार तपशील पुढीलप्रमाणे :**

1) Advanced Accounting
2) Auditing & Taxation
3) Business Regulatory Framework
4) International Economics

   **Optional Group-1**

5) Business Admi.-II
6) Business Admi.-III

# F.Y.B.Com. (2019 Credit Pattern)
## Subject & Code

| | SEMESTER-I | | SEMESTER-II | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Subject Name** | **Sub Code** | **Subject Name** | **Sub Code** |
| 1 | Compulsory English -I | 111 | Compulsory English -II | 121 |
| 2 | Financial Accounting - I | 112 | Financial Accounting - II | 122 |
| 3 | Business Economics - I | 113 | Business Economics - II | 123 |
| 4 | Business Mathematics and Statistics - I | 114 A | Business Mathematics and Statistics - II | 124 A |
| 5 | Element Commercial Geography- I | 115 C | Element Commercial Geography- II | 125 C |
| 6 | Marketing & Salesmanship-I | 116 C | Marketing & Salesmanship-II | 126 C |
| 7 | Bhasha Ani Kaushalyavikas - I (Marathi) | 117 B | Bhasha Ani Koushayavikas - II ( Marathi) | 127 B |
| 8 | Intellectual Property Rights Law | 12019-VA04_1 | VA2 Employability Skill Enhancement Programme | 12021-VA05_1 |

# S.Y.B.Com. (2019 Credit Pattern)
## Subject & Code

| | SEMESTER-III | | SEMESTER-IV | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Subject Name** | **Sub Code** | **Subject Name** | **Sub Code** |
| 1 | Business Communication - I | 231 | Business Communication -II | 241 |
| 2 | Corporate Accounting - I | 232 | Corporate Accounting - II | 242 |
| 3 | Business Economics - I (Macro) | 233 | Business Economics - II (Macro) | 243 |
| 4 | Business Management - I | 234 | Business Management - II | 244 |
| 5 | Elements of Company Law - I (C. Law) | 235 | Elements of Company Law - II ( C. Law) | 245 |
| 6 | Business Administration - I | 236 A | Business Administration - II | 246 A |
| 7 | AECC-1 Environmental Awareness - I | 23999 | AECC-1 Environmental Awareness - II | 24999 |

# T.Y.B.Com. (2019 Credit Pattern)
## Subject & Code

| | SEMESTER-V | | SEMESTER-VI | |
|---|---|---|---|---|
| Sr. No. | Subject Name | Sub Code | Subject Name | Sub Code |
| 1 | Business Regulatory Framework-I (M.Law) | 351 | Business Regulatory Framework-II (M.Law) | 361 |
| 2 | Advanced Accounting - I | 352 | Advanced Accounting - II | 362 |
| 3 | International Economics - I | 353B | International Economics - II | 363B |
| 4 | Auditing & Taxation - I | 354 | Auditing & Taxation - II | 364 |
| 5 | Business Administration 2 - I | 355A | Business Administration 2 - II | 365A |
| 6 | Business Administration 3 - I | 356A | Business Administration 3 - II | 366A |

■ विद्यार्थ्यांना जादा गुणांक (क्रेडिट) मिळवण्यासाठी खालील विषयांची निवड करता येईल.

## Bachelor Of Commerce Credit Courses

| Sr. No. | Subject Code | Subject Name |
|---|---|---|
| 1 | GR2-A | Sport Representation At College Level [G] |
| 2 | GR2-B | Sport Representation At University/State Level 2 [G] |
| 3 | GR3-A | National Social Service Scheme (Participation In Camp)[G] |
| 4 | GR3-D | N.S.S. republic Day Parade (Participation )[G] |
| 5 | GR4-A | Avishkar Participation; Extension Activity Participation,Cu[G] |
| 6 | GR4-B | Avishkar Selection At University Level [G] |
| 7 | GR4-C | Avishkar Winner At State Level [G] |
| 8 | GR5-A | Research Paper Presentation At State/National Level[G] |
| 9 | GR5-B | Research Paper Presentation At International Level[G] |
| 10 | GR6-A | Participation In Summer School/Programme; Short Term Course[G] |
| 11 | GR7-A | Scientific Survey, Societal Survey,[G] |
| 12 | GR8-A | Field Visits; Study Tours; Industrial Visits; Participation[G] |
| 13 | GR9-A | Online Certificate Courses/Mooc Courses/ Career Advancement[G] |
| 14 | VA1 | Computerised Accounting[I] |
| 15 | VA2 | Employability Skill Enhancement Programme[I] |
| 16 | VA4 | Intellectual Property Rights Laws[I] 1 |
| 17 | VA5 | Value Education[I] |

।। जीवनाय ज्ञानं वरम्।।

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

**अ) प्रवेशासंबंधी सूचना :**

१) महाविद्यालयाने निर्धारीत केलेल्या वेळेतच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल.

२) प्रवेश घेताना निवडलेले विषय नंतर बदलून मिळणार नाहीत.

३) महाविद्यालयीन कामकाजाबाबत विद्यार्थी व पालकांनी कार्यालयात प्रथम भेटावे. त्यानंतर आवश्यकता भासल्यास संबंधितांनी परवानगी घेऊनच मा. प्राचार्यांना भेटावे.

४) प्रवेश पावत्या विद्यार्थ्याने हरविल्यास पावत्या पुन्हा मिळणार नाही.

५) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जावर व ओळखपत्र कार्डवर फोटो चिटकवून द्यावेत आणि विद्यार्थ्यांनी परीक्षा ॲडमिट कार्डवर व रजिस्टरवर चिटकविण्यासाठी दिलेल्या फोटोच्या मागील बाजूस पूर्ण नाव, वर्ग व रोल नंबर लिहून द्यावेत.

६) प्रवेश अर्जावर बरेच विद्यार्थी आपला घरचा पत्ता पूर्ण व व्यवस्थित लिहीत नाहीत. अशा वेळी अपूर्ण पत्यामुळे विद्यार्थ्यास, पालकांस पाठविलेली पत्रे परत येतात. अशी पत्रे न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

७) महाविद्यालयात प्रवेश देणे किंवा न देणे मा. प्राचार्यांच्या अधिकारात राहील.

८) प्रवेश रद्द करणेची प्रक्रिया शासन व विद्यापीठ नियमानुसार राबविण्यात येईल.

९) विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यानंतर कोणत्याही सबबीवर भरलेली फी परत दिली जाणार नाही.

**ब) परीक्षेसंबंधी सूचना :**

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना ट्युटोरियल्स, पूर्व परीक्षा, सहामाही परीक्षा, पर्यावरण परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच वेळोवेळी सूचना फलक पाहून विद्यापीठाचे परीक्षा फॉर्मस भरणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्याने विद्यापीठाचे फॉर्मस भरले नाही तर त्याच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

**क) विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या सर्व विषयांच्या तासिकांना नियमाप्रमाणे वेळेवर हजर राहिले पाहिजे.

२) दररोज सर्व तासिकांना जर विद्यार्थी हजर असेल तरच त्यांची उपस्थिती धरली जाईल.

३) प्रत्येक सत्रात ७५% उपस्थिती व योग्य वर्तणूक नसल्यास त्याला मिळणारी शिष्यवृत्ती किंवा इतर कोणत्याही प्रकाराची सरकारी किंवा अन्य सवलत रद्द होऊ शकते. वरील कारणामुळे स्कॉलरशिप अगर सवलत रद्द झाल्यास त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

४) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने ओळखपत्र महाविद्यालयाच्या आवारात वावरताना स्वत:च्या गळ्यात असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, लेखनिक अगर सेवक यांनी केव्हाही मागितल्यास त्याने ते ताबडतोब दाखवावे.

५) महाविद्यालयाच्या सुचना फलकावर तसेच संकेत स्थळावर विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी सूचना लावल्या जातात. सूचना वाचली जात नाही, ही सबब चालणार नाही. सूचना न वाचल्यास विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक, आर्थिक अथवा अन्य नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
६) तास चालू असताना कोणत्याही विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या आवारात, व्हरांड्यात थांबू नये. आपल्या वागण्याने कोणत्याही वर्गास कोणत्याही तऱ्हेचा उपद्रव होणार नाही याची व्यक्तिश: व सामुहीक जबाबदारी घ्यावी.
७) विद्यार्थ्यांचा पोषाख नीटनेटका असावा.
८) महाविद्यालयाचे कामकाज, प्रतिष्ठा व शिस्त यांना बाधा होईल, असे कोणतेही वर्तन महाविद्यालयात किंवा बाहेर होऊ नये किंवा करता कामा नये.
९) वर्गात, ग्रंथालय, कार्यालयात, आवारात व सभारंभाच्या वेळी सभागृहात शांतता राखण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने खबरदारी घेतली पाहिजे.
१०) प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी/सेवक यांच्याशी गैरवर्तन करणाऱ्यास कडक कारवाई केली जाईल.
११) महाविद्यालयातील विविध उपक्रम शांततेत यशस्वी करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर आहे.

# शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप)

- **शिष्यवृत्तीसाठी पात्रता :**

१) शिष्यवृत्ती मिळणारे विद्यार्थी या महाविद्यालयात शिकत असले पाहिजेत.
२) तो/ती प्रथम प्रयत्नात आधीची परीक्षा उत्तीर्ण झालेली असावे. त्या परीक्षेत किमान ५५% गुण प्राप्त झालेले असले पाहिजेत. (बॅकलॉग नसावा.)
३) अभ्यासक्रमातील कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम यात निपुनता असल्यास त्याचा/तिचा प्राधान्याने विचार केला जाईल.
४) एका पेक्षा जास्त सवलतीचा फायदा विद्यार्थ्यास घेता येणार नाही.
५) अर्जासोबत तहसिलदार यांचा अधिकृत उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
६) विद्यार्थ्यांचे आधारकार्ड व ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.
७) विद्यार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.
८) बँक खात्याशी आधार नंबर व मोबाईल नंबर लिंक असणे गरजेचे आहे.

- **राज्यशासनाच्या आर्थिक सवलती/शिष्यवृत्ती :**

१) अनुसुचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती/फी माफी
२) शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती
३) भारत सरकार शिष्यवृत्ती
४) राष्ट्रीय शिष्यवृत्ती
५) अपंग मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती
६) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना पात्रतेनुसार मिळणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती/फी माफी.

७) संरक्षण खात्यातील सेवकांच्या मुला मुलींना मिळणारी फी माफी व स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला-मुलींना मिळणारी फी माफी.

८) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणारी फी माफी.

९) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत देण्यात येणारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती.

वरील सर्व शिष्यवृत्ती व सवलतींसाठी कार्यालयात चौकशी करावी. फॉर्म घेऊन ते व्यवस्थितरित्या भरून सर्व आवश्यक कागदपत्रांसहीत कार्यालयात जमा करावेत.

■ **शिष्यवृत्ती व फी सवलतीसाठीचे नियम :**

१) एकापेक्षा जास्त सवलतीचा फायदा विद्यार्थ्यास घेता येणार नाही. जास्तीत जास्त फायदा असणारी सवलत विद्यार्थ्यास दिली जाते.

२) महाविद्यालयात नियमित ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

३) अभ्यास क्रमातील प्रगती व वर्तणूक समाधानकारक असली पाहिजे.

४) महाविद्यालयातील सर्व परीक्षांत विद्यार्थी उत्तीर्ण असला पाहिजे.

५) सर्व शिष्यवृत्तीचे फॉर्म कार्यालयात वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार वेळेत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेले अर्ज पात्र असणार नाहीत.

■ **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मिळणारी शिष्यवृत्ती**

१) **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाहाय्य योजना :**

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अव्यवसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाहाय्य योजना सुरू केलेली आहे. याबाबत सर्व नियम, अटी व अर्ज भरण्याचा दिनांक इ. सूचना सूचनाफलकावर लावण्यात येतील.

२) **आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसाहाय्य योजना :**

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ता धारक गरजू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अव्यावसायीक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसाहाय्य योजना सुरू केलेली आहे. याबाबत सर्व नियम, अटी व अर्ज भरण्याचा दिनांक इ. सूचना सूचनाफलकावर लावण्यात येतील.

३) **राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना :**

मागासवर्ग घटकातील गुणवत्ता धारक गरजू विद्यार्थ्यांसाठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ही शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. सदर अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीच्या पुणे विद्यापीठाच्या नियम व अटींनुसार पात्र ठरल्यास शिष्यवृत्ती प्राप्त होते. याबाबत सर्व नियम, अटी व अर्ज भरण्याचा दिनांक इ. सूचना सूचनाफलकावर लावण्यात येतील.

४) **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी योजना :**

गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुणे विद्यापीठाने सन २०१३-१४ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गुणवंत विद्यार्थी योजना सुरू केलेली आहे. याबाबत सर्व नियम, अटी व अर्ज भरण्याचा दिनांक इ. सूचना सूचनाफलकावर लावण्यात येईल.

५) **संस्था व महाविद्यालयाच्या वतीने प्रदान करण्यात येणारे साहाय्य व शिष्यवृत्ती :**
तृतीय वर्ष कला, वाणिज्य व बारावी परीक्षेला प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने स्मृतीचिन्ह व इतर वर्गामध्ये वार्षिक परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी विकास मंडळामार्फत विद्यार्थी विकास निधी व विद्यार्थी मदत निधी यामधून आर्थिक सहाय्य दिले जाते.

■ **शिष्यवृत्तीसंबंधी माहिती :**

| शिष्यवृत्तीचा प्रकार | अटी व पात्रता | आवश्यक दाखले |
|---|---|---|
| भारत सरकार शिष्यवृत्ती | मागीलवर्षी परीक्षा उत्तीर्ण झालेले मागासवर्गीय विद्यार्थी | १) उत्पन्न दाखला मूळ प्रत तहसिलदार यांच्या सहीने (OBC साठी नॉन क्रिमीलेयर आवश्यक)<br>२) जातीचा दाखला नक्कल प्रत |
| भारत सरकार फ्रीशिप शिष्यवृत्ती | उत्पन्न मर्यादा - SC, NT,OBC रु. ८ लाखांपेक्षा कमी | १) OBC साठी नॉन क्रिमीलेयर दाखला<br>२) जादा उत्पन्नासंबंधीचा पालकांचा योग्य नमुन्यातील दाखला<br>३) जातीचा दाखला नक्कल प्रत |
| राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | मागील परीक्षेत ६६% पेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज करू शकतात. | गुणपत्रकाच्या दोन नक्कल प्रती |

# महाविद्यालयातील विविध उपक्रम

- **विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत –**

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
२) विशेष मार्गदर्शन योजना.
३) विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास योजना.
४) आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा
५) निर्भय कन्या योजना.

- **राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) -**

१) नियमित कार्यक्रम

२) ७ दिवसांचे विशेष श्रमसंस्कार शिबीर.

- **आजीवन अध्ययन व विस्तार विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत –**

१) महिला सबलीकरण कृतिसत्र

२) जेष्ठ नागरीक एकदिवसीय कृतिसत्र.

३) रोजगार व व्यवसाय उद्‌बोधन कृतिसत्र.

- **बहि:शाल शिक्षण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत –**

१) संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरीक व्याख्यानमाला.

२) डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला.

३) यशवंतराव चव्हाण स्पर्धा परीक्षा व्याख्यानमाला.

- **इतर उपक्रम :**

* वार्षिक क्रीडा स्पर्धा
* सांस्कृतिक कार्यक्रम (विविध गुणदर्शन)
* महाविद्यालयीन समिती
* माहिती अधिकार समिती
* पालक–शिक्षक समिती
* स्पर्धा परीक्षा विभाग
* शैक्षणिक सहलीचे आयोजन.
* वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ
* अँटी रॅगिंग कमिटी
* माजी विद्यार्थी समिती
* प्रवेश समन्वय समिती

■ **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :**

गरीब, हुशार, गरजु व होतकरु विद्यार्थी केवळ गरीबीच्या कारणामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून महाविद्यालयात 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली व शिक्षणाबरोबरच अर्थाजन करण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला. महाविद्यालयात ही योजना सुरू असून त्यासाठी काही मोजक्या व पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाते. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच काम देऊन योग्य तो मोबदला देऊन त्यांना उच्च शिक्षण चालू ठेवण्याची संधी दिली जाते. विद्यापीठाकडून या योजनेसाठी अर्थसाहाय्य उपलब्ध होत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे.

■ **व्यवसाय मार्गदर्शन :**

या महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वावलंबी बनावे, काही स्वतंत्र उद्योग सुरू करावेत ही देखील अपेक्षा आहे. त्या दृष्टीने त्याला प्रेरणा देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे काम आमच्या महाविद्यालयातील व्यवसाय मार्गदर्शन केंद्र करीत असते. या संबंधातील मार्गदर्शनपर पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिके, व्यवसाय सहली, रोजगार व व्यवसाय उद्‌बोधन, कृतिसत्र व अधिकारी व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

- **क्रीडा विभाग :**

खेळामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक असा सर्वांगीण विकास होत असतो. खेळातून सांघिक भावना, संघवृत्ती, शिस्त व एकी असे कितीतरी राष्ट्रीय चारित्र्यास उपयोगी पडणारे गुण अंगी बाणतात. आमचा क्रीडा विभाग त्या दृष्टीने कार्यरत आहे. आंतर महाविद्यालयीन आंतर विद्यापीठ क्षेत्रातील एक कार्यक्षम व गौरवप्राप्त असा आमचा क्रीडा विभाग आहे. विद्यापीठस्तरीय कबड्डी स्पर्धा, ज्युनियर कबड्डी स्पर्धा, ज्युनियर कॉलेज खो-खो, ॲथलेटीक्स, नेटबॉल, बॉक्सिंगमध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय यश संपादन केले आहे.

सन २०१८-२०१९ मधील पुणे विभागातर्गत पुणे जिल्हा विभागाच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये एकूण ३ खेळाडू सहभागी झाले होते. कबड्डी स्पर्धेमध्ये एकूण ११ खेळाडू सहभागी होते, तर नेटबॉल स्पर्धेमध्ये एकूण ८ खेळाडू सहभागी झाले होते. तसेच बॉक्सिंग १ खेळाडू आंतरविभागीय स्पर्धेमध्ये निवड होऊन सहभागी झाले होते. दरवर्षी महाविद्यालयात क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते.

- **सांस्कृतिक कला मंडळ विभाग :**

विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक कला मंडळ विभागाअंतर्गत वर्षभर अनेक उपक्रम राबवले जातात. या माध्यमातून आंतर महाविद्यालयीन एकांकिका (नाटक) स्पर्धा तसेच नृत्य स्पर्धा यांमध्ये सहभागी होण्याची महाविद्यालय विद्यार्थ्यांस संधी देत असते. या विभागांतर्गत विद्यार्थ्यांचे कलात्मक गुण त्यांच्या व्यक्तिमत्वास पूरक असे बनविण्याचे काम करतात. महाविद्यालयातील विद्यार्थी आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये विविध कला माध्यमात सहभागी होतात तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत होणाऱ्या 'इंद्रधनुष्य' युवक महोत्सवात सुद्धा सहभागी झाले आहे. विद्यार्थ्यांमध्ये कलात्मकता दडलेली असते त्यातून त्यांचा विकास व्हावा, स्पर्धात्मक शैली वाढावी यासाठी कला मंडळ सतत कार्यरत असते.

- **मराठी वाङ्मय मंडळ :**

आपली मातृभाषा आपली अस्मिता असते,अभिमान असतो याच जाणिवेतून मराठी वाङ्मय मंडळ वर्षभर मराठी भाषेशी निगडित उपक्रमे आयोजित करत असते. मराठी भाषा दिवस, मराठी राज्यभाषा दिवस, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अशा विशेष दिवसांचे आयोजन होत असते. या कार्यक्रमात भाषा आणखी वृद्धिंगत होण्यासाठी; विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे महत्त्व अधिक सुदृढ करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य, वाचन कौशल्य, विचार कौशल्य यावर विशेष भर दिला जातो.

- **ग्रंथालय विभाग :**

समृद्ध व सुसज्ज ग्रंथालय हे महाविद्यालयाचे भूषण आहे. २१ व्या शतकात पदार्पण करत असताना नवीन सुरू होत असलेले अभ्यासक्रम प्रत्येक विषयात येणारे ज्ञान, आजचे विविधांगी स्पर्धात्मक युग यांचा विचार करून भावी पिढी ज्ञानसंपन्न व्हावी या हेतूने ग्रंथालय समृद्ध करण्यात आले. विविध विषयांचे संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, पाक्षिके, त्रैमासिके, वृत्तपत्रे यांनी ग्रंथालय परिपूर्ण आहे. त्याचबरोबर आमच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना ज्ञान भांडार उपलब्ध आहेत याचा आम्हाला रास्त अभिमान आहे.

■ **ग्रंथालयाची वैशिष्ट्ये :**

१) ग्रंथपालाकडून ग्रंथालय परिचय २) विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका व विद्यार्थिनी कक्ष
३) स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष ग्रंथालय सुविधा ४) संगणक प्रशिक्षण व्यवस्था
५) सर्व विषयांचे संदर्भग्रंथ ६) विविध नियतकालिके

■ **ग्रंथालयासंबंधी आवश्यक सूचना :**

१) ग्रंथालयात येताना ओळखपत्र आवश्यक आहे.
२) संदर्भग्रंथ, अभ्यासक्रम, प्रश्नसंच, मासिके, वृत्तपत्रे, नियतकालिके ही ग्रंथालयातच पहावयास मिळतील, ती ग्रंथालयाबाहेर किंवा घरी दिली जाणार नाहीत.
३) सर्व वर्गाची देवाण-घेवाण नियमित चालू राहील.
४) दुसऱ्या विद्यार्थ्यांचे ओळखपत्र, बॉरोकार्ड यावर पुस्तके मिळणार नाहीत.

■ **आदिवासी अंक :**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या कला व साहित्यिक गुणांना वाव देण्यासाठी सावित्री या अंकाचे प्रकाशन केले जाते यामध्ये विद्यार्थ्यांच्या कविता, लेख, कथा, हास्यविनोद, त्यांचे अनुभव तसेच प्राध्यापकांचे लेख इत्यादी गोष्टींचा समावेश केला जातो. त्यासाठी महाविद्यालयात संपादक मंडळ कार्यरत आहे.

■ **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

सन २००९-१० पासून महाविद्यालयात स्पर्धा मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे. केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, बॅंकिंग इ. स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर परीक्षांच्या दृष्टीने उपयुक्त तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने नियमितपणे आयोजित केली जातात.

■ **आरोग्य तपासणी व विद्यार्थिनींसाठी वैद्यकीय सल्ला :**

विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी प्रथम वर्षासाठी एफ.वाय.बी.ए., एफ.वाय.बी.कॉम या वर्गांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी केली जाते. ही तपासणी संबंधित विद्यार्थ्यास बंधनकारक असते. याशिवाय महाविद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांसाठी गरजेनुसार किमान वैद्यकीय तपासणी/सल्ला ही सेवा वर्षभर पुरविण्यात येते.

■ **राष्ट्रीय सेवा योजना :**

महाविद्यालयीन युवतीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास साधन्यासाठी व त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत आहे. या विभागाच्या वतीने ७ दिवसांचे श्रमसंस्कार शिबीर घेण्यात येते व विविध वर्षभर नियमित कार्यक्रम घेण्यात येतात.

■ **इंटरनेट सुविधा :**

आजचे माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात विद्यार्थ्यांना माहिती त्वरीत उपलब्ध व्हावी म्हणून महाविद्यालयात स्वतंत्र संगणक कक्ष असून, इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

- **सूचना पेटी :**
  विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कामकाजाबाबत विधायक सूचना करण्यात याव्यात, यासाठी महाविद्यालयात सूचना पेटी ठेवण्यात आलेली आहे.
- **ओळखपत्र बाळगणे आवश्यक :**
  महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असले पाहिजे. ओळखपत्राशिवाय ग्रंथालय, अभ्यासिका, संगणक कक्ष यांचा लाभ घेता येणार नाही. आपल्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून आवश्यक ती माहिती भरून ओळखपत्रावर संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. गतवर्षीच्या विद्यार्थ्यांनी ओळखपत्राचे नुतनीकरण दिलेल्या मुदतीत करून घ्यावे. ओळखपत्र गळ्यात घालणे आवश्यक आहे.
- **रॅगिंग कायद्याविषयी :**
  रॅगिंगला आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने रॅगिंग रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे आचारसंहिता तयार केली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने व पालकाने रॅगिंग करणार नाही असे प्रतिज्ञापत्र दिले पाहिजे. जर रॅगिंग करताना एखादा विद्यार्थी आढळला तर त्यास संपूर्ण वर्षाच्या शैक्षणिक लाभापासून दूर ठेवणे, सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती, फेलोशिप किंवा अन्य तत्सम लाभ थांबविणे, परीक्षेस बसण्यास मनाई करणे, विभागीय राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संमेलने स्पर्धा किंवा युवक महोत्सवातील सहभागापासून दूर ठेवणे, वसतीगृहातून काढून टाकणे, प्रवेश रद्द करणे, ठराविक काळासाठी अन्य कोणत्याही शिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यापासून प्रतिबंध करणे, रुपये २५ हजारापासून १ लाखापर्यंत दंड करणे इत्यादी शिक्षा होऊ शकतात.
- **टीप :** रॅगिंग करणार नाही, असे लेखी विद्यार्थी व पालकांचे प्रतिज्ञापत्र मिळाल्याशिवाय विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम होणार नाही.
- **मोबाईल :** विद्यार्थ्याने वर्गात मोबाईल घेऊन जाऊ नये. कायद्याने मोबाईल वर्गात घेऊन जाणे गुन्हा आहे.
- **टी.सी./दाखला/बोनाफाईड :**
  महाविद्यालयातील विद्यार्थ्यास सिनियर कॉलेज टी.सी. ज्युनियर कॉलेज दाखला, बस पास व अन्य कामासाठी बोनाफाईड मागणीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज घेऊन त्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स जोडून स्वत: विद्यार्थ्यांना सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत फी सह पूर्तता केल्यानंतर टी.सी./ दाखला अर्ज पूर्ततेनंतर तिसऱ्या दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत देण्यात येतील.
- **इतर उपक्रम :**
  विद्यार्थी-विद्यार्थिनींमधील बौद्धिक, साहित्यिक, सांस्कृतिक व कला गुणांचा अधिकाधिक विकास होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न आणि अद्ययावत होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात वाङ्मय नियोजन मंडळ, वाणिज्य मंडळ, अर्थशास्त्र मंडळ, राज्यशास्त्र मंडळ, इतिहास मंडळ, विज्ञान मंडळ, भूगोल मंडळ इ. अनेक मंडळे तसेच निबंध, कथा, कविता, नाट्यवाचन, अभिनय, वक्तृत्व, गायन, खेळ, इ. स्पर्धा युवा स्पंदन हस्तलिखित असे विविध उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाची अशी अनेक दालने उपलब्ध असतात वन्यजीव सप्ताह, विज्ञान दिन, चित्रकला स्पर्धा, नृत्यस्पर्धा, थोर व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथी इ. च्या स्मरणार्थ काही मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात येतात. शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते.

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) महाविद्यालयीन कामकाजाबाबत विद्यार्थी व पालकांनी कार्यालयात प्रथम भेटावे. त्यानंतर आवश्यकता भासल्यास संबंधितांनी परवानगी घेऊनच मा. प्राचार्यांना भेटावे.

२) ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात प्रवेश करू नये.

३) महाविद्यालयाने निर्धारीत केलेल्या वेळेतच विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेल.

४) प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी स्कॉलरशीप संदर्भात व शैक्षणिक सवलतीचे अर्ज विशिष्ट मुदतीत कार्यालयामध्ये सादर करावेत. अर्ज सादर केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याकडून त्याची पोहोच घेणे आवश्यक आहे. नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

६) प्रवेश पावत्या विद्यार्थ्याने हरविल्यास डुप्लिकेट पावत्या पुन्हा मिळणार नाही.

७) अकरावीला प्रवेश घेण्यापूर्वी दहावीचा शाळा सोडल्याचा दाखला आणि गुणपत्रिका यांच्या प्रत्येकी पाच झेरॉक्स प्रती प्रमाणित करून ठेवाव्यात. मूळ दाखला कोणालाही परत मिळणार नाही. एफ.वाय.ला प्रवेश घेणाऱ्यांची मूळ गुणपत्रिका ही एक वर्षानंतर परत मिळेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

८) प्रवेश अर्जावर बरेच विद्यार्थी आपला घरचा पत्ता पूर्ण व व्यवस्थित लिहीत नाहीत. अशा वेळी अपूर्ण पत्यामुळे विद्यार्थ्यास, पालकांस पाठविलेली पत्रे परत येतात. अशी पत्रे न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

९) विद्यार्थ्यांना वेळोवेळी दिलेल्या पावत्या, प्रमाणपत्रे, गुणपत्रिका इ. कागदपत्रांची गरज भासते. यासाठी विद्यार्थ्यांनी अशी सर्व कागदपत्रे एका स्वतंत्र फाईलमध्ये जपून ठेवावीत.

१०) प्रवेश देताना विद्यार्थ्यांच्या गतवर्षीच्या वर्तणूकीचा विचार केला जाईल.

११) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जावर व ओळखपत्रावर फोटो चिटकवून द्यावेत तसेच परीक्षा ॲडमिट कार्डवर व रजिस्टरवर चिटकविण्यासाठी दिलेल्या फोटोच्या मागील बाजूस पूर्ण नाव, वर्ग व रोल नंबर लिहून द्यावेत.

१२) प्रवेश रद्द करणेची प्रक्रिया शासन व विद्यापीठ नियमानुसार राबविण्यात येईल.

१३) वर्गात मोबाईल वापरणे, वर्गात न बसणे, इतरांना त्रास देणे इत्यादींमध्ये सापडल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केली जाईल.

# ARTS, COMMERCE & SCIENCE JUNIOR COLLEGE, DEHANE

## FEE STRUCTURE

| Sr. No. | Particalurs of the Fee | Arts | Commerce | | Science | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | XI | XII | XI | XII |
| 1. | Admission Fee | | 18 | 24 | 18 | 24 |
| 2. | Term Fee | | 32 | 36 | 32 | 36 |
| 3. | Tution Fee | | 4,150 | 4,150 | 6,350 | 6,350 |
| 4. | Student's Activities/Magazine | | 1,000 | 1,000 | 1,000 | 1,000 |
| 5. | Student's Aid Fund | | 10 | 10 | 10 | 10 |
| 6. | Tutorial/College Exam, Unit Test | | 150 | 150 | 150 | 150 |
| 7. | I Card | | 50 | 50 | 50 | 50 |
| 8. | Comman Breakage | | 200 | 200 | 200 | 200 |
| 9. | Laboratory Fee (for Science Student's) | | 0 | 0 | 100 | 100 |
| 10. | Gymkhana Fee | | 100 | 100 | 100 | 100 |
| 11. | C.D.F. | | 200 | 200 | 200 | 200 |
| 12. | Library Deposit | | 100 | 0 | 100 | 0 |
| 13. | Laboratory Deposit (only for Sci.) | | 0 | 0 | 300 | 0 |
| | **Total Fee** | | **6,010** | **5,920** | **8,610** | **8,220** |

Hutatma Rajguru Shikshan Prasarak Mandal's
**ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, DEHANE**
Tal, Khed, Dist. Pune - 412 402

# FEE STRUCTURE

| Sr. No. | Particalurs of the Fee | Arts | | | Commerce | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | F.Y. | S.Y. | T.Y. | F.Y. | S.Y. | T.Y. |
| 1. | Admission Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 2. | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 3. | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 4. | Practicals Fee Commerce | 0 | 0 | 0 | 50 | 100 | 125 |
| 5. | Lab Fee Commerce | 0 | 0 | 0 | 345 | 345 | 345 |
| 6. | Student's Activities/Magazine | 1,000 | 1,000 | 1,000 | 1,000 | 1,000 | 1,000 |
| 7. | Environment Awareness | 0 | 240 | 0 | 0 | 240 | 0 |
| 8. | Gem Breakage | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 9. | Corpus Fund | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 |
| 10. | Cooputerization Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 11. | Student's Aid Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 12. | Student's Health Schem | 30 | 0 | 0 | 30 | 0 | 0 |
| 13. | Student's Welfare Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 14. | University Developement | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 15. | Eligibity Fee & Form Fee P.U. | 350 | 0 | 0 | 350 | 0 | 0 |
| 16. | Student's Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 17. | Pro-rata Ashwamegha | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 18. | Desaster Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 19. | Administrative Charges | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 20. | Tution Fee | 3,900 | 3,900 | 3,900 | 3,900 | 3,900 | 3,900 |
| 21. | Library Deposit | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 |
| 22. | Caution Moeny Deposit | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 |
| 23. | University Ragistration Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 24. | Physical Efficiency Drive Prog. | 20 | 20 | 0 | 20 | 20 | 0 |
| 25. | N.S.S. Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 26. | I Card | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 27. | Physical Education Schem Fees | 50 | 0 | 0 | 50 | 0 | 0 |
| | **Total Fee** | **6,594** | **6,204** | **5,964** | **6,989** | **6,649** | **6,434** |

# CAREER KATTA : COURSE LIST

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Python Programming | 26) | Digital Banking |
| 2) | Python for AIML | 27) | Digital Marketing |
| 3) | Python for web Development | 28) | Political Ethics and Value |
| 4) | Cloud computing | 29) | Leadership Development |
| 5) | Devops | 30) | Literacy about Judicial Process |
| 6) | Data analytics with tableau and power BI | 31) | Constitutional Values and Ethics |
| 7) | Social Media Profile Management | 32) | Certificate in Office Administration |
| 8) | Financial Literacy | 33) | Certificate in Training Management |
| 9) | Event Management | 34) | Organic Farming |
| 10) | Fund Flow Management | 35) | Fruits and Vegetables Drying Dehydration and Technology |
| 11) | Communication Skill & Personality Development | 36) | Certificate course in World Politics |
| 12) | बीपीटी १९४९ संस्था नोंदणी कायदा प्रशिक्षण | 37) | Certificate course in Rural Development |
| 13) | Road Safety and Awareness Training | 38) | Scientific Temperament |
| 14) | परदेशी नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्त्व विकास | 39) | Green Chemistry |
| 15) | Foundation Course in Business Law | 40) | Renewable Energy |
| 16) | माहिती अधिकार कायदा प्रशिक्षण | 41) | Nanotechnology |
| 17) | Soft Skill Training Program | 42) | Biotechnology |
| 18) | Certificate Course in Human Right | 43) | Medical Lab Technology |
| 19) | Certificate Course in Journalism | 44) | Nano Biotechnology |
| 20) | Communication Skill Program | 45) | Introduction to Forensic Science |
| 21) | Content Writing Course | 46) | Tourism Management |
| 22) | Basic of Cost & Works Accounting | 47) | Forensic Accounting |
| 23) | E- Filling | 48) | Cyber Law |
| 24) | Soft Skill Development | 49) | Office Management |
| 25) | Introduction to Basic Concept of Accounting | 50) | Consumer Protection Act 2010 |

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- सुसज्ज इमारत
- महाविद्यालयापर्यंत मोफत बस सुविधा
- वसतिगृहाची सोय
- विद्यार्थी विकास मंडळ
- कमवा व शिका योजना
- पार्किंगची उत्तम सोय
- स्पर्धा परीक्षा विभाग
- सुसज्ज प्रयोगशाळा व भव्य क्रीडांगण
- कॅन्टिन सुविधा
- अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक
- अत्यंत माफक फी
- सर्व प्रकारच्या शासकीय शिष्यवृत्ती
- राष्ट्रीय सेवा योजना
- अभ्यासासाठी पुरक व शांत वातावरण
- विविध मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन
- अद्ययावत ग्रंथालय व संगणक कक्ष
- निसर्गरम्य परिसर

### ■ महाविद्यालयाची वेळ ■

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे**
सकाळी ८.३० ते दुपारी २.००

■

**कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, डेहणे**
सकाळी १०.०० ते दुपारी ३.००

■

**कार्यालय :** सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.००

■

**ग्रंथालयाची वेळ :** सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.००

---

**प्र. प्राचार्य डॉ. जयराम पांडुरंग खाडे**

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे**
**व**
**कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय**
ता. खेड, जि. पुणे - ४१२ ४०२. मोबाईल नं. : ९४२३१९२६९२